
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय
दा.क्र. ९२८३



कांहींतरी नवेंच करा!

BVBK-0401243
BVBK-0401243

# चिरंजीव मरण

कांहीं तरी नवेंच करा : ३१

# चिरंजीव मरण

•

रा. स. भट

१२४३ दि० २०।५।८९
बा. बा.

BVBK-0401243
BVBK-0401243

पन्नास नये पैसे

वोरा अँण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.
मुंबई २.

श्री : १९०

::


© १९५९
वोरा अ‍ॅण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

::

प्रकाशक:
अ. ल. गाडगीळ
वोरा अ‍ॅण्ड कंपनी
पब्लिशर्स, प्रा. लि. करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता,
मुंबई २.

::

आवृत्ति दुसरी
१९६२

::

मूल्य ५० नये पैसे

::

मुद्रक :
अनंत जे. शाह
लिपिका प्रेस,
कुर्ला रोड, अंधेरी,
मुंबई ५९.

साता समुद्रांपलीकडून मूठभर माणसांहातीं इंग्रज हिंदुस्थानावर राज्य करीत होता. पारतंत्र्याच्या चरकांत पिचत असलेल्या भारतीय जनतेचें क्रंदन कितीहि करुण असलें तरी तें जगभर ऐकूंहि जात नव्हतें. इंग्रज म्हणजे जेते, हिंदी म्हणजे जित, अशी भावना होती.

अशा त्या काळांत प्रत्यक्ष इंग्रजाच्या घरांत एका हिंदु तरुणानें जी गोष्ट केली तिनें इंग्लंड तर हादरलेंच, सारें जगहि हादरलें. परतंत्र हिंदुस्थानचें करुण क्रंदन नव्हे, तर त्या पारतंत्र्याविरुद्ध तो दंड थोपटून उठल्याची भीषण गर्जना साऱ्या जगांत घुमली.

ती गर्जना घुमविणाऱ्या तेजस्वी देशभक्ताचें नांव मदनलाल धिंग्रा. या तरुण क्रांतिकारकाचा मान भारतीय शस्त्र-क्रांतीच्या क्षेत्रांत फार मोठा, महत्त्वाचा आणि पहिला समजला जातो.

सर कर्झन वायली याच माणसाची निवड त्याचवेळीं राजकीय वधासाठीं केली गेली ह्याचें कारण ते तत्कालिन भारतमंत्र्यांचे 'नेत्र' समजले जात. त्यांच्या द्वाराच हिंदुस्थानांतील दडपशाहीचीं सारीं सूत्रें हालत. म्हणून त्यांचा बळी घेण्याचें काम धिंग्रांकडे आलें.

वास्तविक वायलीशीं मदनलालचा वैयक्तिक तंटा नव्हता. त्यांना स्वदेशावर पारतंत्र्य लादणाऱ्यांना धडा शिकवावयाचा होता. — आणि हें काम धिंग्रांनीं ज्या धिमेपणानें, संयमानें, कौशल्यानें, निर्भयतेनें पार पाडलें त्याचीच ही लहानशी कथा — तेवढेंच चरित्र. धिंग्रांचें हें मरणच चिरंजीव ठरलें. देशासाठीं असें चिरंजीव मरण पत्करणारे धन्य होत.

# चिरंजीव मरण : मदनलाल धिंग्रा

भारताच्या स्वातंत्र्यासाठीं बलिदान केल्यामुळें इतिहासांत अमर झालेल्या नररत्नांपैकीं मदनलाल धिंग्रा हे एक होत. धिंग्रा हे पंजाबमधील रहिवासी असून जातीनें हिंदु क्षत्रिय होते. त्यांचे वडील पंजाबमधील आरक्षक (पोलीस) खात्यांत डी. एस्. पी. या वरिष्ठ अधिकाराच्या जागीं होते व यामुळें त्यांना सरकारांत मोठा मान होता. यामुळेंच हिंदुस्थानांतील पुष्कळ मोठ्या गोऱ्या अधिकाऱ्यांबरोबर त्यांचा परिचयहि होता. मदनलालजींचें घराणें हें चांगलें सुविद्य असून त्यांचे दोघे बंधु विद्यार्जनासाठीं इंग्लंडला गेले होते. मदनलाल यांचे थोरले बंधु हिंदुस्थानांत आंग्ल वैद्यकाचें शिक्षण घेऊन पुढील शिक्षणासाठीं इंग्लंडांत जाऊन राहिले होते, व धाकटा भाऊहि इंग्लंडांतच विद्यार्जन करीत होता.

मदनलालजी इंग्लंडला गेले त्यावेळीं त्यांचें वय २१-२२ वर्षांचें होतें. विलायतेस जाण्यापूर्वींच त्यांचा विवाह झालेला होता व त्यांना एक मुलगाहि होता. मदनलाल यांच्या हूड स्वभावामुळें त्यांना शिक्षणासाठीं परदेशांत धाडण्यास त्यांचे वडील सिद्ध नव्हते. परंतु करारी स्वभावाच्या मदनलालनीं वडिलांच्या द्रव्यसाहाय्याची वाट

न पहातां इंग्लंडला जाणाऱ्या एका बोटीवर आग-वाल्याच्या साहाय्यकाचें काम मिळविलें आणि १९०६ च्या ऑक्टोबर-नोव्हेंबरांत ते इंग्लंडांत पोहोंचले.

**लंडनमधील क्रांतिकारकांच्या रहस्यागारांत**

इंग्लंडास गेल्यावर मदनलालजींनीं आपलें नांव लंडन येथील युनिव्हर्सिटी कॉलेज या संस्थेंत इंजिनीयर होण्याच्या उद्देशानें नोंदविलें. इतर अनेक विषयांत आपलें मन रमविणाऱ्या मदनलाल धिंग्रांचें अभ्यासाकडे दुर्लक्ष नव्हतें. त्यांच्या अभ्यासविषयक प्रगतीबद्दल लिहितांना क्रांतिकारकांचे अग्रणी स्वा. वीर सावरकर म्हणतात, "मदनलाल धिंग्रा यांचा विद्यालयांतील अभ्यासक्रम फारच चांगला होता व ते परीक्षेंत पहिले आलेले होते."

सार्वजनिक कार्याची मुळांतच आवड असणारे मदनलाल धिंग्रा हे त्यावेळीं लंडनमध्यें भारतीय स्वातंत्र्या-साठीं कार्य करीत असलेल्या स्वा. वीर सावरकर यांच्या अभिनव भारत संस्थेकडे आकृष्ट झाले यांत कांहींच आश्चर्य नाहीं. शामजी कृष्णवर्मा यांनीं स्थापि-लेल्या "भारतभवन" संस्थेशीं त्यांचे लवकरच संबंध निर्माण झाले. या संस्थेच्या वतीनें १८५७ च्या स्वातंत्र्य-समरांत भाग घेतलेल्या नेत्यांचा दि. १० मे १९०८ या दिवशीं भारतभवनांत अर्धशताब्दि स्मृति दिन साजरा करण्यांत आला. या समारंभांत मदनलाल धिंग्रा यांनीं उत्साहानें भाग घेतला होता. या उत्सवांत भाग घेणाऱ्यांनीं १८५७ च्या वीरांच्या सन्मानार्थ आपल्या कोटावर

वीरमुद्रा धारण केल्या होत्या. किंचित् तापट असलेल्या मदनलालजींच्या कोटावर त्यांनीं धारण केलेली ही वीरमुद्रा त्यांच्या एका विद्यालयीन स्नेह्यानें चेष्टेनें दूर फेकल्यानें ते इतके चिडले कीं या स्नेह्याच्या अंगावर ते सुरा घेऊन तुटून पडले. मदनलालचा देशाभिमान असा जाज्वल्य होता.

धिंग्रा यांच्या वृत्तींत जाज्वल्य हिंदुत्वाचाहि वास होता. अभिनव भारताच्या लंडन येथील अंतर्गत केंद्रांत कांहीं अहिंदूंना समाविष्ट करून घेण्यांत आलें आहे ही गोष्ट धिंग्रा यांना आवडली नाहीं. "अरे यार" या आपल्या आवडत्या संबोधनानें सुरुवात करून ते वारंवार बजावीत कीं, "हे लोक, विशेषतः यांतले मुसलमान, केव्हां दगा देतील याचा नेम नाहीं." सावरकरांनीं स्थापन केलेल्या "फ्री इंडिया" सोसायटीच्या व्याख्यानांच्या व इतर कार्यक्रमांना धिंग्रा मधून मधून उपस्थित असत. तरी सामान्यतः त्यांस चर्चा करणें वगैरे विषयांचा कंटाळा असे. भारतभवनांत होणाऱ्या साप्ताहिक बैठकींना ते फारसे उपस्थित नसत. मात्र विनायकराव सावरकर यांच्यावर अतिशय श्रद्धा असल्यामुळें त्यांच्या व्याख्यानांना ते नियमित उपस्थित रहात व त्यांचें व्याख्यान एकाग्रपणानें ऐकत.

## धिंग्रांचें अलोट धैर्य

जपानी लोकांच्या शौर्याबद्दलच्या गोष्टी बोलल्या जात असतां कोणीतरी हिंदुस्थानाविषयीं अपमानास्पद उद्गार काढले असतां मदनलाल धिंग्रा चवताळून उठले. "माझें राष्ट्रहि तितकेंच शूर व साहसी आहे व लवकरच

आमच्या धाडसाचीहि लोक कीर्ति गाऊं लागतील" असें ते म्हणाले. हे शब्द ऐकून धिंग्रांचे तरुण हिंदी मित्र म्हणाले, "हा पोकळ डौल आहे. शरीरकष्ट व देशवीरत्व यांत आमचे लोक अढळ रहात नाहींत." शेवटीं हा वाद पैजेवर येऊन हिंदु लोकांच्या साहसाची परीक्षा पहाण्याचें ठरलें. एक टाचणी घेऊन ती धिंग्रांच्या हातावर टोचण्यास त्यांच्या मित्रांनीं आरंभ केला. धिंग्रांनीं तो हात तसाच अढळ ठेविला. सर्व टाचणी आंत रोविली गेल्यावर रक्त बाहेर उसळलें तरीहि धिंग्रांनीं आपला हात यत्किंचितहि जागचा हलविला नाहीं.

भारतभवनाच्या तिसऱ्या मजल्यावर असलेल्या एका माळ्यावरील खोलींत बॉंब तयार करणें, बॉंबसाठीं लागणारीं रसायनें तयार करणें इत्यादि काम गुप्तपणें चाले. एका अपरात्रीं हें काम चाललें असतां सावरकरांच्या हें लक्षांत आलें कीं, तापत चाललेलें कांचेचें भांडें आगीवरून उतरून घेण्याची वेळ झालेली आहे व तें उतरण्याचा चिमटा जवळ नाहीं. उष्णतेची आंच अधिक लागली तर भांडें फुटेल, रासायनिक द्रव्यांचा स्फोट होऊन सर्वच बिंग एकदम फुटेल अशी भीति उत्पन्न झाली. हा प्रसंग टाळण्यासाठीं काय युक्ति योजावी हा प्रश्न सावरकरांच्या मनांत घोळत होता तोंच मदनलालनीं हात पुढें केला व बेडरपणें भांडें घट्ट धरून तें चटकन खालीं उतरून ठेवलें. तळहाताची कातडी पोळून निघाली तरी मदनलालचें तिकडे काडीचेंहि लक्ष नव्हतें.

अर्थात् मदनलाल जसे धाडसी होते तसे ते हूड व हेकटहि होते. त्यांच्या या हूडपणाचा कधीं कधीं भारत-भवनांतल्या इतर मंडळींनाहि त्रास होई. १९०८ सालांतील एका रविवारीं भारतभवनाच्या आंतल्या बाजूच्या खोलींत साप्ताहिक बैठकीचीं व्याख्यानें चालू असत. मदनलालच्या लहरी स्वभावास अनुसरून सडकेलगत असलेल्या भारत-भवनाच्या खोलींत त्यांनीं ग्रामोफोनच्या तबकडचा लावण्याचा सपाटा लावला. सडकेकडील खिडकीबाहेर अल्लड पोरींचा घोळका जमलेला—खिडकीपाशीं मदनलालजी तबकडचा लावण्यांत रंगून गेलेले. यामुळें होणाऱ्या गलग्यामुळें बैठकींत चाललेल्या व्याख्यानांत सारखा व्यत्यय येऊं लागला. हा उपद्रव कोण देत आहे हें पहाण्यासाठीं सावरकर बाहेर आले, तों मदनलाल ! तेव्हां मदनलालना उद्देशून ते म्हणाले "हें रे काय ? कृतीच्या नि हौतात्म्याच्या गोष्टी बोलतोस आणि त्या गोष्टी श्रेष्ठ म्हणून बैठकी व चर्चा टाळतोस ! या पोरींचा घोळका नि या गाण्याच्या ललकाऱ्या हीं काय कृतीचीं नि हौतात्म्याचीं लक्षणें ? तुला बैठकीला येणें पटत नसेल तर येऊं नकोस पण इतरांना त्रास होईल असें तरी कांहीं करीत जाऊं नकोस !" सावरकरांचे हे शब्द ऐकून मदनलाल फारच खजील झाले. ग्रामोफोन वगैरे पसारा आवरून ते जे एकदम पसार झाले, ते तीन चार दिवस भारतभवनाकडे फिरकलेहि नाहींत.

## चेतलेलें हौतात्म्य

मदनलालजी भारतभवनांतून गेले खरे पण त्यांच्या मनांत सावरकरांचे शब्द सारखे घोळत राहिले. 'आपण हौतात्म्याच्या गोष्टी बोलतों त्याप्रमाणें कृति करणें आपलें कर्तव्य नाहीं काय ?' हा विचार त्यांच्या मनांत उभा राहिला. सावरकरांना भेटून आपल्या मनाचें शंकानिरसन करून घ्यावें असें त्यांना वाटे. पण त्यांना तोंड कसें दाखवावें ? अशी शंका मनांत वारंवार उभी राहूं लागली. अखेर तीन चार दिवस गेल्यावर निर्धार करून आपल्या शंकांचें निवारण करून घेण्याचा निश्चय करून मदनलाल भारतभवनांत आले. सावरकरांना एकीकडे गांठावयाचें असा विचार मनांत असल्यामुळें मदनलालना भारतभवनाच्या एका कडेच्या विभागांत कांहीं वेळ वाट पहावी लागली.

संध्याकाळीं जेवणाआधीं हातपाय धुऊन सावरकर आपल्या खोलीकडे जाण्यासाठीं निघणार तोंच त्या एकान्त ठिकाणीं मदनलालनीं सावरकरांना गांठलें. सावरकरांच्या समोर ते कांहीं वेळ मुकाट्यानें उभे राहिले. पूर्वीचा भेटीचा प्रसंग स्मरणांत असल्यानें मदनलाल थोडा वेळ स्तब्ध राहून सावरकरांशीं बोलूं लागले. संभाषणाच्या ओघांत हौतात्म्य गाजविण्याची वेळ आली आहे असें खरोखर आपणांस वाटतें काय ?" असा प्रश्न मदनलालनीं विचारला. मदनलालच्या या प्रश्नाला "हुतात्मा मनानें खंबीर व सिद्ध झालेला असेल तर हेंहि त्यांत प्रायः गर्भित असतें

कीं हौतात्म्य गाजविण्याची वेळ प्राप्त झालेली आहे'' हें उत्तर सावरकरांनीं दिलें. आपण या बाबतींत पूर्ण विचारानें दृढ निश्चय केला आहे असें मदनलालनीं सावरकरांना सांगितल्यावर मदनलाल सावरकरांच्या खोलींत गेले व तेथें त्यांचें कांहीं वेळ संभाषण झालें.

यानंतर धिंग्रा कांहीं दिवसपर्यंत सावरकरांच्या खोलीवर वारंवार येत असत. या दोघांच्या संभाषणाच्या वेळीं मुंबईचे हरिश्चंद्र कोरेगांवकरहि उपस्थित असत. कोरेगांवकर हेहि मदनलालजींप्रमाणें इंजिनियरिंगचाच अभ्यास करीत असल्यानें त्यांची व मदनलालची चांगली ओळख होती. या त्रिवर्गाच्या चर्चेंत जें काय ठरलें त्याचा परिणाम म्हणजे मदनलालजींच्या वर्तनाला नवेंच वळण मिळालें. सावरकर व कोरेगांवकर यांच्याशीं चर्चा केल्यानंतर थोडयाच दिवसांनीं मदनलाल धिंग्रा यांनीं रिव्हॉल्व्हरचा परवाना आपल्या नांवें मिळविण्याची खटपट केली व हा परवाना मिळतांच एक सहा बारी कोल्ट रिव्हॉल्व्हर विकत घेतलें. हें रिव्हॉल्व्हर हातीं आल्यावर तें वापरण्याच्या कामीं प्रावीण्य मिळविण्याच्या उद्योगाला ते लागले. हें शिक्षण राजरोसपणें घेण्यास कांहींच प्रत्यवाय नव्हता म्हणून धिंग्रांनीं फेब्रुवारी-मार्च महिन्याच्या सुमारास हें शिक्षण घेण्यास नियमित सुरुवात केली.

नेमबाजीच्या अभ्यासानें त्यांच्या स्थापत्यशास्त्राच्या अभ्यासांत मात्र त्यांनीं खंड पडूं दिला नाहीं; तो पूर्वीप्रमाणें चालू होताच. पण नुसती नेमबाजी शिकून कार्य होणारें नव्हतें. त्यासाठीं त्यांनीं एक नवीन उद्योग आरंभिला.

प्रमुख नागरिक ज्या ठिकाणीं जमतात अशा ठिकाणीं सहज प्रवेश मिळविण्याच्या दृष्टीनें त्यांनीं नॅशनल इंडियन असोसिएशन या संस्थेच्या कार्यवाह मिस् एमा जोसेफिन बेक या बाईशीं परिचय करून घेतला. या संस्थेंत कोण लोक येतात ? या संस्थेच्या सभासदांचे वर्ग किती ? वेगवेगळचा वर्गांतील सभासदांचे अधिकार काय ? इत्यादि बारिक सारिक गोष्टींची माहिती मिळवून एप्रिल महिन्यांत मदनलाल त्या संस्थेचे 'असोशिएट मेंबर' झाले. हिंदी विद्यार्थ्यांना 'माणसाळविण्या'ची मोहीम सुरू झाल्यावर कांहीं कल्पक इंग्रजांनीं हिंदी विद्यार्थ्यांसाठीं हा सभासद-वर्ग हेतुतः निर्माण केला होता. यासाठीं वार्षिक पांच शिलिंग ही सवलतीची वर्गणी ठरविण्यांत आली होती. ही वर्गणी देणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यास या संस्थेंत प्रवेश मिळे व सामान्य सभासदांचे बहुतेक सर्व अधिकार त्यास उपभोगतां येत. मोठमोठचा इंग्रज गृहस्थांचा विश्वास संपादन करण्याच्या दृष्टीनें धिंग्रांनीं त्यांच्या वतीनें हिंदी विद्यार्थी जगतांतील गुप्त बातम्या काढण्याचें कामहि पत्करलें !

## क्रांतीचा गुरुमंत्र

एप्रिल महिन्यांत मदनलालजी हे पूर्वीचें निवासस्थान सोडून देऊन मिसेस् मेरी हेरिस या बाईच्या घरीं रहावयास गेले. त्यावेळेपासून भारतभवनांतील विद्यार्थी त्यांच्याबद्दल जास्त च संशयग्रस्त बनूं लागले. मदनलालचें भारतभवनांतील जाणें-येणेंहि पूर्वीपेक्षां पुष्कळच कमी झालें होतें.

दि. ३ एप्रिलपासून सावरकरांनीं इंडिया हाऊसमधील आपलें वास्तव्य संपविलें व बिपिनचंद्र पाल यांच्या निवासस्थानीं चालणाऱ्या वसतिगृहांत ते जाऊन राहिले. मे महिन्याच्या शेवटीं अगर जूनच्या प्रारंभीं "फ्री इंडिया सोसायटी"च्या कांहीं सभासदांकडून मदनलाल यांच्याविरुद्ध ठराव मांडण्यांत आला, तेव्हां सावरकरांनीं त्यांच्या वतीनें रदबदली केली. 'मदनलाल फितूर झाला म्हणून त्याला आपल्या संस्थेच्या यादींतून वगळावें' असा प्रस्ताव कांहीं सभासदांनीं मांडला तेव्हां सावरकरांपुढें मोठा पेंच निर्माण झाला.

मदनलालविरुद्ध असा ठराव संमत होणें त्यांस मान्य नव्हतें. म्हणून "इतके दिवस आपल्याबरोबर वागलेल्या सहकाऱ्याविरुद्ध एकदम असा प्रस्ताव करणें बरें नाहीं. आपण कांहीं दिवस थांबून काय घडतें तें पाहूं. मी त्याच्या वर्तनावर बारीक नजर ठेवतों. त्याच्या वर्तनांत फरक होत नाहीं असें दिसलें तर आपण या अवधीनंतर काय करावयाचें तें करूं," असें त्यांनीं आपल्या सहकाऱ्यांस सांगून त्यांची समजूत घातली.

वेस्टमिन्स्टर पोलीस कोर्टांत मदनलाल धिंग्रा यांच्यावरील अभियोगाचें काम चालू असतां एका साक्षिदारानें असे उद्गार काढले कीं, दि. १ जुलै या दिवशीं कर्झन वायलोचा प्रत्यक्ष वध करण्यापूर्वीं कांहीं दिवस त्याचें मन विचारमग्न दिसत असे व यावरून कांहीं भयंकर कृत्य करण्याचें त्याच्या मनांत घोळत असावें असें त्याच्या वर्तनावरून दिसे. डॉ. धिंग्रा यांनीं सर कर्झन वायलो यांना

लिहिलेल्या पत्रांतहि मदनलालच्या अनावर वर्तनाचा उल्लेख केला होता व मदनलाल वारंवार भारतभवनांत जातो याविषयीं नापसंती व्यक्त केलेली होती. डॉ. धिंग्रांचें हें पत्र मिळाल्यावर वायलींनीं मदनलाल यास पत्र धाडून इंडिया ऑफिसमध्यें आपली भेट घेण्यास सुचविलें होतें. एकंदरींत भारतभवनांतून गुप्तवार्ता मिळविण्याचें चांगलें साधन आपल्या हातीं आलें आहे या आनंदांत कर्झन वायलीसाहेब कांहीं दिवस होते असें दिसतें. इतक्यांत दि. १ जुलै १९०९ या दिवशीं "नॅशनल इंडियन असोसिएशन" या संस्थेचा वार्षिक समारंभ इंपीरियल इन्स्टिटयूटच्या जहांगीर हॉलमध्यें साजरा होणार असल्याची घोषणा झाली.

### शिकारीची सिद्धता

समारंभाला कोण कोण येणार आहेत ? निमंत्रितांचें स्वागत करण्याच्या कामावर कोणाची नेमणूक आहे ? निमंत्रितांत हिंदी पाहुणे कोण असतील ? हिंदी व इंग्रज निमंत्रितांना पोषाखासंबंधीं कांहीं सूचना देण्यांत आल्या आहेत काय ? समारंभ केव्हां सुरू होईल व केव्हां संपेल ? वगैरे माहिती मदनलालजींनीं आधींच मिळवून ठेवली. इंपीरियल इन्स्टिटयूटच्या कार्यवाह मिस् बेक यांची पूर्वींच ओळख असल्यामुळें या बाबतींत त्यांस कांहींच अडचण आली नाहीं. या समारंभाच्या आदल्या सायंकाळीं मदनलाल बिपिनचंद्र पाल यांच्या निवासस्थानीं

सावरकरांच्या भेटीसाठीं गेले होते, पण सावरकर इतरत्र गेले असल्यानें त्यांची भेट होऊं शकली नाहीं.

आदल्या दिवशीं संध्याकाळीं ते सावरकरांना भेटण्यासाठीं आले त्यावेळीं त्यांची वृत्ति चंडोलाप्रमाणें उल्हसित होती. ते भारतभवनांत असत तेव्हां त्यांची वृत्ति चिंतनपर असे. त्या संध्याकाळची त्यांची वृत्ति तशी नव्हती. आपल्या मनांत काय चाललें आहे याचा सुगावा कुणाला लागूं नये या दृष्टीनें ते फारसे बोलले नाहींत हें खरें. इंपीरियल इन्स्टिटच्यूटमधील समारंभाला धिंग्रा उपस्थित राहणार आहेत हें सावरकरांना २९ जूनपूर्वींच कळलें होतें. सावरकरांचे सहकारी ग्यानचंद वर्मा यांना अभिनव भारताचे प्रमुख या नात्यानें सावरकरांनीं लंडन न सोडण्याची सूचना दिली. इंपीरियल इन्स्टिटच्यूटमधील समारंभाला हजर राहण्याविषयींचा आदेशहि त्यांनीं वर्मा यांना दिला.

दि. ३० जूनला सावरकर व धिंग्रा यांची भेट झाली नाहीं तरी ती वायली यांच्या वधापूर्वीं केव्हांतरी झाली असली पाहिजे. कारण दि. १ जुलै या दिवशीं रात्रीं कर्झन वायलीचा वध झाल्यावर मदनलालजींची झडती घेण्यांत आली त्या वेळीं हातांतल्या रिव्हॉल्व्हरशिवाय आणखी दोन रिव्हॉल्व्हर्स त्यांच्याजवळ असल्याचें आढळलें.

दि. १ जुलै या दिवशीं दुपारीं, संध्याकाळीं मला जेवावयाचें नाहीं असें सांगून व मधल्या वेळचें खाणें नेहमींपेक्षां अगोदर मागवून दुपारीं दोन वाजण्याच्या सुमारास मदनलाल आपल्या बिऱ्हाडांतून बाहेर पडले.

सहा वाजेपर्यंत ते बाहेरच होते. मधल्या तीन तासांच्या अवधींत ते मोर्लेसाहेबांच्या नेमबाजीच्या शाळेंत गेले. बारा बार उडवून झाल्यावर मदनलालजींनीं मोर्लेसाहेबांना सहा पेन्स दिले. तेव्हां मोर्ले साहेब म्हणाले, "तुम्ही आमचें नेहमींचें गिऱ्हाईक. यापुढें बारा बारांसाठीं सहा पेन्सऐवजीं तुम्हांपासून चार पेन्सच घेत जाऊं!" अशा तऱ्हेचें संभाषण झाल्यावर मदनलालजींनीं आपलें रिव्हॉल्व्हर साफ करून मागितलें व रिव्हॉल्व्हरची साफसुफी होऊन तें हातीं आल्यावर मदनलालजी तेथून बाहेर पडले.

सहा वाजण्याच्या सुमारास ते आपल्या बिऱ्हाडीं परत आले व खोलींत गेले. इंपीरियल इन्स्टिटयूटमध्यें समारंभाला उपस्थित राहणाऱ्या हिंदी गृहस्थांनीं एक तर स्वदेशी पद्धतीचा पोषाक करून यावें अगर इंग्रजी समाजांत रात्रीचा म्हणून जो विशिष्ट पोषाख घालतात, तो घालून यावें असें सुचविण्यांत आलेलें असतांहि मदनलालजींनीं सामान्य इंग्रज लोक नेहमीं ज्या तऱ्हेचा पोषाख करीत तसा पोषाख केला. तिन्ही रिव्हॉल्व्हर्स नीट करून तीं खिशांतून जागच्या जागीं ठेवलीं. नुकताच मिळविलेला खंजीर व बारा इंच लांबीचा सुरा म्यानांत घालून खिशांत योग्य जागीं ठेवले. अशा तऱ्हेनें सिद्धता करून मदनलाल बाहेर जाण्यास सज्ज झाले. तोंवर सायंकाळचे सात वाजून गेले होते. निघण्याच्या वेळीं अस्मानी रंगाची पंजाबी पगडी डोक्यावर चढविली व डोळ्यांवर एक ऐटबाज चष्माहि चढविला.

नॅशनल इंडियन असोसिएशनचा वार्षिक समारंभ मोठ्या थाटांत साजरा होणार असें घोषित करण्यांत

आलें होतें. त्यासाठीं प्रमुख निवडक अशा दोनशें व्यक्तींना या समारंभाचीं निमंत्रणें धाडण्यांत आलेलीं होतीं. मदनलाल धिंग्रा समारंभाच्या जागीं आले तों आठ वाजून गेले होते. निमंत्रितांना देण्यांत आलेल्या प्रवेशपत्रिकांपैकीं आपली प्रवेशपत्रिका आपणांजवळ नाहीं हें त्यांच्या लक्षांत आलें. या अडचणीचा परिहार करणें फारसें कठीण नाहीं हेंहि त्यांना आठवलें. ज्यांच्या प्रवेशपत्रिका गहाळ झाल्या असतील अशांनीं एका नोंदणीपुस्तकांत स्वाक्षरी करावयाची व प्रवेश मिळवावयाचा असा संस्थेचा प्रघात असल्याचें त्यांना माहीत होतें. त्याप्रमाणें अवश्य त्या नोंदणीपुस्तकांत स्वाक्षरी करून त्यांनीं जहांगीर हॉलमध्यें प्रवेश मिळविला. आंत शिरतांच ते ओळखीच्या मंडळींशीं मनमोकळेपणानें गप्पा मारूं लागले. निमंत्रितांच्या बाबतींत लावण्यांत आलेला पोषाखाचा नियम न पाळणारा हा गृहस्थ कोण या जिज्ञासेनें पुष्कळसे निमंत्रित त्यांच्याकडे आकृष्ट झाले होते. विशेषतः त्यांच्या मनमोकळपणानें निमंत्रितांत मिसळण्यामुळें ते कुतूहलाचा विषय बनले होते. संस्थेच्या चिटणीस ( कार्यवाह ) मिस् बेक या त्यांच्या चांगल्या परिचयाच्या असल्यानें मदनलाल त्यांच्याशींहि मधून मधून गप्पा मारीत होते. “स्वदेशीं परत केव्हां जाणार ?” असा प्रश्न या बाईंनीं विचारतांच “युनिव्हर्सिटी कॉलेजच्या शेवटच्या परीक्षेंत उत्तीर्ण झालों कीं आक्टोबरांत निघणारच !”

**उच्च हेतूनें भारलेला देशभक्त**

मदनलाल ज्या हेतूनें तेथें आले होते त्याचा लवलेशहि त्यांच्या वर्तनांत किंवा दर्शनांत दिसत नव्हता. आणि त्याचें कारण उघड होतें कीं, सर्वसामान्य मनुष्य एखाद्याचा खून करण्यासाठीं निघाला म्हणजे जे रागद्वेष त्याच्या नजरेंत नि वागण्यांत दिसून येतात ते येथें मुळींसुद्धां नव्हते. मदनलालच्या गोळ्यांना बळी पडलेले कर्झन वायली किंवा त्यांना सोडविण्यासाठीं मध्यें पडल्यामुळें ठार झालेले डॉ. लालकाका यांपैकीं कोणाहिबद्दल मदनलाल धिंग्रांच्या मनांत व्यक्तिशः द्वेष नव्हता. तसा तो असण्याचें कांहीं कारणहि नव्हतें. तर कर्झन वायली हा हिंदुस्थानाला पारतंत्र्यांत जखडणाऱ्या ब्रिटिश सरकारचा प्रतिनिधि म्हणून धिंग्रांसमोर उभा होता. जुलमी ब्रिटिश साम्राज्याविषयीं अर्थातच, जाज्वल्य देशभक्तीनें प्रेरित झालेल्या मदनलालच्या मनांत द्वेष पुरेपूर भिनलेला होता. आणि ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं विशेषतः–५७ सालापासून हिंदवासियांवर केलेल्या अनन्वित अत्याचारांच्या सूडानें तो तरुण देशभक्त नखशिखान्त पेटलेला होता.

आणि म्हणूनच न्यायासनासमोर जेव्हां "खुनी" या शब्दानें धिंग्रांचा उल्लेख होऊं लागला तेव्हां स्पष्ट शब्दांत त्यांनीं त्या बाबतींत विरोध प्रकट केला. कारण मदनलाल धिंग्रा खुनी नव्हतेच. एका माणसाचा खून करून त्यांना व्यक्तिशः पैसा, मान किंवा दुसरा कोणताहि लाभ साधावयाचा नव्हता. उलट त्यांतून काय मिळणार होतें याची

त्यांच्यासारख्या सुविद्य आणि सुजाण गृहस्थांना परिपूर्ण कल्पना होती—आणि तरीहि त्यांनीं तें सतीचें वाण पत्करलें होतें. केवळ देशासाठीं, देशाच्या स्वातंत्र्यासाठीं आणि म्हणूनच अशा भयंकर प्रकाराच्या क्षणभर पूर्वींहि मदनलालची मनःस्थिति पूर्ण शांत आणि वृत्ति समतोल होती. इतकेंच काय, सभागृहांत त्यांच्या हातून दोन खून पडले आणि त्यामुळें एवढी भयंकर खळबळ माजली, त्यानंतर आलेल्या डॉक्टरनीं जेव्हां मदनलालची नाडी पाहिली तेव्हां तेहि आश्चर्यचकित झाले. त्यावेळींहि मदनलालची नाडी अगदीं शांतपणें चाललेली होती. त्यांना तपासणाऱ्या डॉक्टरनीं ही वस्तुस्थिति न्यायासनापुढें दिलेल्या साक्षींतहि सांगितली.

सभागृहांत त्यानंतर काय घडलें तें जगजाहीरच आहे. मदनलालनीं शांतचित्तानें परंतु अचूक झाडलेल्या गोळ्यांनीं कर्झन वायली परलोकीं निघून गेले आणि आयत्या वेळीं त्यांच्या अंगावर धांवून आलेले डॉ. लालकाका या एका पारशी गृहस्थावरहि धिंग्रांना गोळी नाइलाजानें चालवावी लागली व त्या गोळीला डॉ. लालकाका बळी पडले. रिव्हॉल्व्हरमध्यें शिल्लक राहिलेल्या पांचव्या गोळीनें स्वतःच्या इतिकर्तव्यता झालेल्या जीवनाचा शेवट करून घेण्याची मदनलालची इच्छा होती. त्यांनीं तसा प्रयत्नहि केला; परंतु तो निष्फळ ठरला आणि ते पकडले गेले.

मदनलाल धिंग्रांना पकडल्यानंतर अर्थातच त्यांच्यावर खटला भरण्यांत आला. आणि तो साऱ्या जगभर गाजला. या वध-प्रकरणाच्या दुसऱ्याच दिवशीं धिंग्रांना वेस्ट-

मिन्स्टर पोलीस कोर्टांत उभें करण्यांत आलें. त्यावेळीं आरोपीच्या पिंजऱ्यांत उभे राहिलेले मदनलाल अत्यंत शांत दिसत होते. आदल्या रात्रींहि पोलीस कोठडींत या धीरोदात्त माणसाला शांत सुंदर झोंप लागलेली होती ! आरोपीच्या पिंजऱ्यामध्यें खिशांत हात कोंबून ऐटींत उभा राहिलेल्या या तरुणाच्या हातून आदल्या रात्रीं कांहीं भयंकर घटना घडली असेल हें सांगूनहि कोणाला खरें वाटलें नसतें.

त्यांना पकडणाऱ्या पोलिसानें जेव्हां 'या आरोपीवर दोन माणसांचा खून केल्याचा आरोप आहे' असें म्हटलें तेव्हां मदनलाल जरा हंसले, आणि एवढेंच म्हणाले, "डॉ. लालकाका यांना मीं हेतुतः ठार मारलेलें नाहीं, इतकेंच मला म्हणावयाचें आहे. माझी व सदर डॉक्टरांची ओळखहि नव्हती. मला धरण्याचा त्यांनीं प्रयत्न केला तेव्हां आत्मरक्षणासाठीं मीं गोळी झाडली."

**निषेधाची लाट व प्रभावी वक्तव्य**

मदनलालनीं देशस्वातंत्र्याच्या हेतूनें केलेल्या या वधामागोमाग त्यांच्या निषेधाची लाट इंग्लंडमध्यें आणि हिंदुस्थानांतहि उसळली हें अगदीं साहजिक होतें. मदनलाल त्यालाहि मनानें सिद्धच होते. त्यांच्या वडिलांनीं परिस्थितीच्या दडपणाखालीं मिंटोसाहेबांना तार करून आपल्या मुलाच्या वर्तनाबद्दल नापसंती व्यक्त केली.

कॅक्स्टन हॉलमध्यें मदनलाल यांच्या निषेधाची सभा झाली. या सभेंत मदनलाल धिंग्रा यांच्या निषेधाचा प्रस्ताव एकमतानें संमत करून घेण्याचा सभेच्या अध्यक्षांनीं

प्रयत्न केला. त्यास सावरकरांनीं विरोध केल्यामुळें प्रकरण हातघाईवर आलें व सभेंत खूपच गोंधळ माजला. शेवटीं वातावरण शांत करण्यासाठीं सभास्थानीं पोलिसांना यावें लागलें. "ज्याची चौकशी अद्याप चालूं आहे असा मनुष्य गुन्हेगार असल्याचें प्रकट विधान करणें म्हणजे न्यायालयाच्या अधिकारावर अतिक्रमण करण्यासारखें आहे," या भूमिकेवरून आपण या प्रस्तावास विरोध केला, अशा आशयाचा खुलासा या प्रकरणीं सावरकरांनीं या सभेनंतर लंडनमधील वृत्तपत्रांतून केला.

धिंग्रांच्या निषेधाची ज्याप्रमाणें लंडनमध्यें लाट उसळली होती त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतहि त्यांच्या कृत्याचा निषेध केला जात होता. दि. १०–७–१९०९ या दिवशीं मदनलाल धिंग्रा यांच्यावरील खटल्याची वेस्ट मिन्स्टर पोलीस कोर्टांत प्राथमिक चौकशी झाली. फिर्यादी पक्षाचा साक्षीपुरावा चालू असतांना मदनलाल अगदीं शांतपणें बसले होते. आपल्या कृत्याचें वर्णन "खून" या शब्दानें केलें जात आहे हें ऐकल्यावर त्यांनीं या शब्दास विरोध दर्शविला. मदनमोहन सिंह या धिंग्राला धरून ठेवणाऱ्या हिंदी विद्यार्थ्याची साक्ष वाचून दाखविण्यांत आली तेव्हां मदनलाल रागानें उसळून म्हणाले, "हा देशद्रोही इसम आहे." आपल्या खिशांत सांपडलेलें वक्तव्य पोलीस दाबून टाकीत आहेत हें पाहून या ठिकाणीं मदनलालजींनीं दुसरें वक्तव्य केलें. हें त्यांचें वक्तव्य पुढीलप्रमाणें आहे :

"व्यक्तिशः माझ्या बचावासाठीं मला कांहींहि म्हणावयाचें नाहीं. पण माझें कृत्य कसें न्याय्य ठरतें हें सिद्ध

करण्यासाठीं मी कांहीं गोष्टी सांगूं इच्छितों. व्यक्तिशः माझ्याविषयीं माझें असें म्हणणें आहे कीं मला अटक करून कारावासांत ठेवण्याचा किंवा मला देहान्ताची शिक्षा सांगण्याचा अधिकार कोणत्याहि इंग्लिश न्यायालयाला नाहीं. माझा बचाव करण्यासाठीं मीं कोणी विधिविशारद वकील दिला नाहीं याचें हेंच कारण आहे. जर्मनांनीं इंग्लंड पादाक्रांत केल्यास त्या आक्रमणाविरुद्ध झगडणारा इंग्रज जर देशाभिमानी ठरत असेल तर मीं इंग्रजांविरुद्ध केलेला झगडा अधिक न्यायाचा व देशाभिमानप्रेरित आहे असें मला म्हणावयाचें आहे. गेल्या ५० वर्षांत आठ कोटि हिंदी माणसांचे खून झाले. या खुनांच्या बाबतींत मी इंग्रजांना दोषी समजतों. इंग्रज प्रतिवर्षीं दहा कोटि पौंड इंग्लंडला आणतात याबद्दलहि मी इंग्रजांना जबाबदार धरतों. येथें इंग्लिश लोक आपल्या देशबांधवांना जें करायला सांगतात तेंच आपल्या देशबांधवांनीं करावें हें उपदेशिल्याबद्दल माझ्या कित्येक देशाभिमानी बांधवांना फांसावर लटकविण्यांत आलें व कित्येकांना हद्दपारीची शिक्षा देण्यांत आली. याचीहि जबाबदारी इंग्रजांवर आहे असें माझें मत आहे. एक इंग्रज उठतो व इंग्लंड सोडून हिंदुस्थानांत जाऊन मासिक १०० पौंड मिळवूं लागतो याचा साधा अर्थ असा आहे कीं तो इंग्रज माझ्या गरीब देशबंधूंना मृत्यूची शिक्षा सांगतो. कारण हा इंग्रज ज्या १०० पौंडांची चांदरात उडवितो त्या १०० पौंडांत हिंदुस्थानांतील हजार लोकांचा चरितार्थ सुखानें चालला असता.

"जर्मनांना जसा इंग्लंड देश आक्रमून राहण्याचा अधिकार नाहीं त्याप्रमाणेंच इंग्रजांनाहि हिंदुस्थान देश आक्रमून राहण्याचा अधिकार नाहीं. आपल्या पावन मायभूला दूषित करणाऱ्या इंग्रजाला हिंदी लोकांनीं मारणें ही गोष्ट संपूर्णपणें समर्थनीय आहे. इंग्रज लोकांनीं चालविलेलें अमानुष ढोंग, त्यांनीं चालविलेला तमाशा व विडंबन या गोष्टी पाहून मला आश्चर्य वाटतें. कांगोमधील जनता व रशिया यांचा कैवार घेऊन बोलणारे हे इंग्रज स्वतःला पददलित मानव समाजाचे पाठीराखे म्हणवतात; पण त्याच वेळीं हिंदुस्थानांत मात्र भीषण जुलूम व भयंकर अत्याचार सुरू आहेत. प्रतिवर्षी हिंदुस्थानांत होणारी वीस लक्ष निरपराध जीवांची हत्या व हिंदी स्त्रियांवर होणारे अत्याचार हीं या जुलमाचीं उदाहरणें होत.

समजा कीं हा इंग्लंड देश जर्मनांनी पादाक्रांत केला—विजेत्याच्या दिमाखानें जर्मन लंडनच्या रस्त्यांतून मिरवूं लागले आणि तें दृश्य असह्य झाल्यामुळें एकाद्या इंग्रजानें पुढें होऊन एकाद दुसऱ्या जर्मनाचा प्राण घेतला तर त्या इंग्रजाला इंग्लिश लोक देशभक्त समजतील. याच दृष्टिकोनांतून मी माझ्या मातृभूमीच्या विमोचनाचें कार्य करण्याला सिद्ध झालों आहें. तशी माझी निश्चिति आहे. याव्यतिरिक्त मला जें म्हणावयाचें आहे तें मी न्यायालयापुढील कागदांत म्हटलें आहे. मीं हें जें सांगितलें तें दयेची याचना करण्याच्या हेतूनें सांगितलेलें नाहीं. तसा प्रकार मुळींच नाहीं. इंग्रज लोकांनीं मला देहान्ताची शिक्षा द्यावी अशीच माझी इच्छा आहे. कारण तसें घडण्यानें

माझ्या देशबांधवांची सूडबुद्धि तीव्र होईल. मीं हें जें म्हणणें न्यायालयापुढें मांडलें तें माझा पक्ष कसा न्यायाचा आहे हें बाह्य जगाला नि विशेषतः अमेरिकेंत, जर्मनींत जे आमचे हितचिंतक आहेत त्यांना समजावें म्हणून मांडलें आहे.

**धारोदात्त वर्तन**

मदनलालनीं हें वक्तव्य केलें त्या दिवशींच्या संध्याकाळच्या वृत्तपत्रांनीं प्रामुख्यानें त्याच विषयाला प्रसिद्धी दिली. लंडन नगराच्या भिंतीभिंतीवरून व दुकानादुकानांवरून धिंग्रांचें नांव सगळीकडे चमकत होतें. "धिंग्राचें विलक्षण वक्तव्य"; "धिंग्रा म्हणतो माझा सूड माझे देशबांधवच घेतील"; "धिंग्रा स्वसमर्थनांत म्हणतो मी देशभक्त आहें"; "धिंग्रा हिंदुस्थानच्या अभ्युदयासाठीं मरण्यास सिद्ध." वगैरे अर्थाचीं पत्रकें मोठाल्या अक्षरांत छापून भिन्न भिन्न वृत्रपत्रांच्या जाहिरातीसाठीं एकाच रांगेनें सर्व लंडन शहरभर, सर्व इंग्लंडभर लटकत होतीं. धिंग्रांनीं केलेल्या वधानें केली नाहीं इतकी उत्क्षोभक खळबळ त्यांनीं केलेल्या या न्यायालयीन वक्तव्यानें उडविली.

धिंग्रा इतके निर्भय व उल्हासी वृत्तीचे होते कीं त्यांनीं मागितलेल्या जिनसांमध्यें एक आरसाहि मागितला होता. "मला पोशाख करण्यासाठीं येथें एकादा आरसा नाहीं तरी एक छानदार आरसाहि धाडून दे" असेंहि त्यांनीं कळविलें होतें. मदनलालना भेटून त्यांना एकवार धन्यवाद देण्याची इच्छा सावरकरांच्या मनांत बरेच दिवस होती. त्याप्रमाणें दि. २२ जुलै या दिवशीं ते आपल्या मित्राला

ब्रिक्स्टन जेलमध्यें जाऊन भेटले. पोलिसांच्या पहाऱ्यांत भेट होणार असल्यानें धिंग्रांचें अभिनंदन आपणांस उघडपणें करतां येणार नाहीं हें ओळखून धिंग्रांना आपलें मनोगत कसें कळवावयाचें याविषयींचा विचार मनाशीं ठरवून सावरकर धिंग्रांच्या भेटीला गेले. "मी आपल्या दर्शनासाठीं आलों आहें." हे शब्द सावरकरांच्या तोंडून निघतांच मदनलालनीं आपल्या गुरूचें मनोगत ओळखलें. सावरकर नेहमींप्रमाणें न बोलतां "दर्शन" हा शब्द आपल्या हौतात्म्याच्या गौरवपर वापरीत आहेत हें मदनलालनीं जाणलें.

उद्यां आपल्याला मृत्यूची शिक्षा सांगण्यांत येणार, त्याचप्रमाणें सावरकरांची व आपली इहलोकांतील ही शेवटचीच भेट आहे हें मदनलाल जाणून होते. आपल्या अखेरच्या इच्छा काय आहेत हें मदनलालनीं याच भेटींत सावरकरांना सांगितलें. आपली उत्तरक्रिया हिंदु धर्माप्रमाणें झाली पाहिजे व कोणाहि अहिंदूचा व आपल्या भावाचा स्पर्श आपल्या प्रेताला होतां कामा नये ही त्यांची पहिली इच्छा होती. कोणातरी ब्राह्मणानें आपल्या प्रेताला मंत्राग्नि द्यावा ही त्यांची दुसरी इच्छा होती व आपल्या खोलींत असलेले कपडे, पुस्तकें व इतर सामानसुमान यांचा लिलाव करून जे पैसे येतील तें लंडनमध्यें हिन्दी लोकांनीं चालविलेल्या राष्ट्रीय निधीला द्यावे ही त्यांची तिसरी इच्छा होती. थिओडोर मॉरिसनसारख्या एका परक्या माणसाच्या नादीं लागून आपल्या सख्ख्या भावानें कॅक्स्टन सभागृहांतील सभेंत आपल्या कृत्याचा निषेध केला या गोष्टीची मदनलालना इतकी चीड आली होती कीं केलेल्या गोष्टीविषयीं

तीव्र पश्चात्ताप व्यक्त केल्यावरहि या भावाची भेट घेण्याला त्यांनीं स्पष्ट नकार दिला.

ज्यूरींतील सभ्यगृहस्थांनीं आरोपी दोषी असल्याविषयींचा आपला अभिप्राय एकमतानें प्रकट केल्यावर मदनलालजींनीं पुढील उद्‌गार काढले–"या न्यायालयाचा अधिकार मी मानीत नाहीं ही गोष्ट मीं वारंवार सांगितली आहे. तुम्हांला हवें असेल तें तुम्ही करूं शकतां. तुम्ही मला देहान्ताची शिक्षा देऊं शकतां; पण मला त्याची कांहींच पर्वा नाहीं. पण हें मात्र स्मरणांत असूं द्या कीं एक काळ असाहि येईल कीं त्यावेळीं आम्ही सर्वश्रेष्ठ सत्ताधारी बनूं. आम्हांला हवें असेल तें त्यावेळीं आम्हीहि करूं. मला याहून जास्त कांहीं सांगावयाचें नाहीं." या भाषणाचा बचाव म्हणून कांहींच उपयोग नव्हता. यामुळें देहान्ताची शिक्षा सांगण्याची खूण म्हणून न्यायमूर्तींनीं काळी टोपी डोक्यावर चढविली. ते म्हणाले, "मदनलाल धिंग्रा, माझ्या कोणत्याहि बोलण्याचा तुझ्यावर यत्किंचितहि परिणाम होणार नाहीं हें मी जाणून आहें. तुझ्यावरील खून केल्याचा आरोप सिद्ध झाला आहे व म्हणून तुला फांशीची शिक्षा देण्यांत येत आहे." यानंतर धर्माधिकाऱ्यानें रीतीप्रमाणें "परमेश्वर तुला क्षमा करो" हा मंत्र म्हटला. इतक्यांत मदनलालजी पिंजऱ्यांत ताडकन् उभे राहिले व न्यायमूर्तींना हिंदी पद्धतीनें नमस्कार करून ते म्हणाले, "मी आपला फार आभारी आहें. मृत्यूची मला पर्वा वाटत नाहीं. माझ्या मायदेशासाठीं बलिदान करण्याचा मान मला मिळाला याबद्दल मला अभिमान वाटत आहे." इतकें

बोलून न्यायमूर्तींना प्रणाम करून आपल्यावरील तीन पहारेकऱ्यांसह मदनलालजी हंसत हंसत निघून गेले.

मदनलाल धिंग्रा यांच्या वर्तनांतील धीरोदात्तपणाचा कांहीं इंग्रजांवरहि इतका विलक्षण परिणाम झाला कीं असा निधड्या छातीचा देशभक्त प्राणाला मुकावा हें त्यांना बरें वाटेना. 'रिव्ह्यू ऑफ रिव्ह्यूज्'चे संपादक स्टेटसाहेब हे अशा सद्‌गृहस्थांपैकीं एक होते. मदनलालना देहान्ता-ऐवजीं जन्मठेप कारावासाची शिक्षा व्हावी असा प्रयत्न त्यांनीं सुरूं केला. मदनलालच्या खिशांत जो जबाब होता तो दाबून टाकण्याचा पोलिसांनीं किती प्रयत्न केला तरी निदान सर्वश्रेष्ठ न्यायालयांत दि. २३-७-१९०९ या दिवशीं तरी तो वाचला जाईल व त्याला सर्वत्र प्रसिद्धी मिळेल, अशी मदनलाल व त्यांची मित्रमंडळी यांची समजूत होती.

पण मदनलालना देहान्ताची शिक्षा सांगणाऱ्या न्याय-मूर्तींनीं तिकडे दुर्लक्ष केलें हें पाहून त्यांना फार वाईट वाटलें. पोलिसांची ही कारवाई हाणून पाडण्यासाठीं काय करतां येईल याचा त्यांनीं विचार करून हें वक्तव्य प्रसिद्ध करण्याची एक योजना आखली. हें वक्तव्य मदनलाल यांनींच लिहिलें आहे असें भासावें यासाठीं खिशांतल्या वक्तव्याची एक प्रत मदनलालच्या खोलींतील पेटींतहि ठेवण्यांत आलेली होती. हीहि प्रत हस्तगत झाली तेव्हां पोलिस खात्याला समाधान वाटलें व दोन्ही प्रती आपल्या हातीं आहेत यामुळें आतां हें वक्तव्य प्रसिद्ध होण्याची शक्यता नाहीं या समाधानांत पोलिस खातें

स्वस्थ होतें. परंतु दि. १० जुलै या दिवशीं मदनलालनीं वेस्ट मिन्स्टर कोर्टांत जें वक्तव्य केलें त्याची भाषासरणी व मूळ वक्तव्य यांत फरक असल्यानें पोलिस खात्याला अशी भीति वाटूं लागली कीं, आपल्या हातीं आलेलें वक्तव्य हें मूळ वक्तव्य नसून त्या वक्तव्याच्या प्रतीच असण्याचा संभव आहे. अर्थात् हें वक्तव्य कोठें असेल व खरोखर त्याचे लेखक कोण आहेत वगैरेविषयीं पोलिस-तपास सुरू झाला असल्यास आश्चर्य नाहीं.

**जगांत खळबळ उडविणारें वक्तव्य**

दि. २९–७–१९०९ या दिवशीं म्हणजे मदनलालना देहान्ताची शिक्षा सांगण्यांत आल्यानंतर सहा दिवसांनीं सावरकर ब्रायटनला निघून गेले व "चॅलेंज" या नांवानें प्रसिद्ध करण्यांत आलेल्या धिंग्रांच्या वक्तव्याच्या प्रसिद्धीची योजना आंखण्यासाठीं त्यांनीं श्री. ज्ञानचंद वर्मा यांनाहि ब्रायटनला बोलावून घेतलें. पॅरिस येथें जाऊन गुप्तपणें "चॅलेंज" या पत्रकाच्या प्रती छापून घेण्याचें काम वर्मां-वर सोपविण्यांत आलें. या वक्तव्याच्या प्रती करून त्या अमेरिका, जर्मनी वगैरे देशांतल्या वृत्तपत्रांत प्रसिद्ध करण्याची निश्चित व्यवस्था झाली. त्यानंतर मदनलालना झालेल्या शिक्षेची अंमलबजावणी होण्यापूर्वीं म्हणजे दि. १७ ऑगस्टपूर्वीं त्यांचें वक्तव्य प्रसिद्ध झाल्याचें समाधान त्यांना लाभावें यासाठीं सावरकरांची खटपट सुरू झाली.

पॅरिसमध्यें राहून श्री. वर्मा यांनीं आपली कामगिरी इतक्या कौशल्यानें पार पाडली कीं पंडित शामजी

कृष्णवर्मा आदि मंडळींनाहि त्याची दाद लागूं शकली नाहीं. दीर्घ प्रयत्नानें इंग्लंडमधील "डेली न्यूज" या सुप्रसिद्ध दैनिकाच्या एका सहसंपादकाचें सहकार्य या वक्तव्याची प्रसिद्धी करण्याच्या कामीं क्रांतिकारकांना मिळालें. या आयरिश सहसंपादकानें रात्रपाळीच्या सहसंपादकाचें काम करतांना आपल्या अधिकारांतच हें वक्तव्य छापून प्रसिद्ध करण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें दि. १५ ऑगस्ट १९०९ च्या रात्रीं या साहसी गृहस्थानें तें प्रसिद्धहि करून टाकलें ! हा साहसी गृहस्थ "डेली न्यूज" च्या संपादकाचा भाचा होता. त्यानेंच मदनलालजींचें हें वक्तव्य छापखान्यांतल्या जुळणिसांच्या हातीं दिलें. दि. १६ या दिवशीं सकाळीं म्हणजे मदनलाल यांच्या शिक्षेची कार्यवाही होण्याच्या सुमारें २८–३० तास अगोदर हें वक्तव्य छापून "डेली न्यूज" पत्राचा अंक लंडन शहरांत विकला जाऊं लागला, तेव्हां पोलिस खात्याच्या अधिकाऱ्यांना मोठाच हादरा बसला. सामान्य वाचकवर्गहि हें पाहून चकित झाला. पत्राच्या संपादकांनाहि हें कसें घडलें हें न कळल्यामुळें खळबळ उडाली. सर्वत्र खळबळ उडविणारें, मदनलाल धिंग्रा यांचें, क्रांतिकार्याला स्फूर्तिदायक असें हें वक्तव्य पुढीलप्रमाणें आहे.

## आव्हान

परवां एका इंग्रजाचें रक्त सांडण्याचा मीं प्रयत्न केला ही गोष्ट मला मान्य आहे. देशाभिमानी हिंदी तरुणांना निर्दयपणानें फांसावर लटकविण्यांत आलें व निर्वासित

करण्यांत आलें याचा अल्पसा सूड म्हणून मीं हें कृत्य केलें. हा प्रयत्न करतांना स्वतःच्या सदसद्विवेक बुद्धीव्यतिरिक्त अन्य कोणाचाहि मीं विचार घेतला नाहीं. स्वतःच्या कर्तव्यबुद्धीशिवाय अन्य कोणाला मीं या कटांत सामील होऊं दिलें नाहीं.

परकी शस्त्रास्त्रांच्या साहाय्यानें दास्यांत जखडून टाकलेलें राष्ट्र हें निरंतरच युद्धयमान राष्ट्र असतें. निःशस्त्र जातीला उघडपणें रणांगणांत उतरून सामना देणें अशक्य होत असल्यामुळें मीं दबा धरून हल्ला चढविला. मला तोफा वापरूं देण्यांत आल्या नाहींत म्हणून मीं माझें पिस्तुल काढलें व तें झाडलें. हिंदु म्हणून माझी भावना अशी आहे कीं माझ्या देशाचा अपमान हा परमेश्वराचाच अपमान होय. ज्याची प्रकृति अशी तशीच आहे व ज्याची बुद्धि सामान्यच आहे अशा मजसारख्या भारतपुत्राजवळ मात्र देशाप्रीत्यर्थ देतां येईल असें कांहीं असलेंच तर तें स्वतःचें रक्त होय ! तें रक्त मी मातृभूमीच्या स्थंडिलावर अर्पिलें आहे. माझ्या मातृभूमीचा पक्ष हा श्रीरामचंद्रांचा पक्ष आहे. माझ्या मातृभूमीची सेवा म्हणजे प्रभु कृष्णाची सेवा होय. हिंदु वंश व इंग्लिश वंश हे दोन वंश हयात आहेत तोंवर भरत खंड व इंग्लंड यांच्या दरम्यान सुरू झालेला हा स्वातंत्र्यसंग्राम चालू राहील. (आज या दोन देशांत जे अस्वाभाविक संबंध आहेत ते संपले नि हा संग्राम संपला तर कोणाला ठाऊक ? ) आत्मबलिदान कसें करावें ही एकच शिकवण सध्यां हिंदुस्थानांत देण्यायोग्य आहे. ही देण्याचा एकच

मार्ग म्हणजे स्वतःचें बलिदान करून मोकळें होणें हा ! या जाणिवेनें प्रेरित होऊन मी प्राणार्पण करीत आहें व माझ्या हौतात्म्याचा मला अभिमान वाटत आहे. याच भारतभूचें संतान म्हणून मला पुनर्जन्म प्राप्त होवो व याच पवित्र कार्यांत माझा देह पुन्हा पडो इतकीच ईश-चरणीं माझी प्रार्थना आहे. भारतीय स्वातंत्र्याचा पक्ष विजयी होऊन मानवजातीचें कल्याण व ईश्वराचें वैभव यांचा पुरस्कार करणारा स्वतंत्र भारतवर्ष जगांत आत्म-तेजानें तळपूं लागेपर्यंत माझ्या जन्ममृत्यूचें हें चक्र असेंच चालूं रहावें अशी माझी परमेश्वरचरणीं प्रार्थना आहे.

वंदे मातरम् ।

## दिव्य बलिदान

मंगळवार दि. १७ ऑगस्ट १९०९ या दिवशीं सकाळीं लंडन येथील पेंटनव्हिलि तुरुंगांत मदनलाल धिंग्रा यांना फांशीं देण्यांत आलें त्या दिवशीं सकाळीं धिंग्रा जरा उशिरांच गाढ झोपेंतून जागे झाले. त्यांनीं उत्तम प्रकारचा पोषाख केला. सकाळचा फराळहि थोडासा केला. सुमारें नऊ वाजतां ठरलेली घंटा घणघणूं लागली. त्या दिवशीं कोणालाच—वर्तमानपत्राच्या वार्ताहरांनाहि—आंत येऊं दिलें जाणार नाहीं असें आधींच स्पष्टपणें घोषित करण्यांत आलें असल्यानें नुसती दरवाज्याबाहेरच गर्दी होती. आशा नसतांहि आंत जाण्यासाठीं धडपड करीत कांहीं हिन्दी लोक तुरुंगाभोंवती घिरट्या घालीत फिरत होते. जवळ जवळ दोन तीनशें इंग्रजहि उभे होते. परंतु आंत कोणालाहि

जातां आलें नाहीं. घंटा वाजूं लागतांच धिंग्रांकडे ख्रिस्ती धर्मोपदेशक आले, परंतु त्यांचा उपदेश आपण हिंदु असल्यामुळें ऐकूं शकत नाहीं, हिंदु धर्माप्रमाणेंच आपण मरणार असें धिंग्रांनीं खडसावून सांगितलें. नंतर अनावृत मस्तकानें व दृढ पदन्यासानें ते वधस्तंभाकडे चालले. ते वधस्तंभावर चढले तेव्हां ते इतके निष्काळजी होते कीं त्यांना कोणत्याहि तऱ्हेच्या साहाय्याची आवश्यकता पडली नाहीं. मृत्युपाशांत मान गुंतली, ठोकळा उडाला व मदनलाल धिंग्रा आठ फूट उंचीवरून मृत्यूच्या जबड्यांत कोसळले. थोड्या वेळानें प्रेताच्या रीतसर चौकशीच्या वेळीं दे. भ. मास्तर या पारशी गृहस्थांना आंत आणविण्यांत आलें. ते धिंग्रांचे व सावरकरांचे स्नेही होते. त्यांच्या समक्ष धिंग्रांच्या प्रेताची रीतसर चौकशी झाली. त्यावेळेस धिंग्रांच्या प्रेताचें दर्शन भयप्रद होतें. मात्र त्यांच्या चेहऱ्यावर दुःखाची वा भयाची छाया नव्हती.

दि. १७ या दिवशींच अमेरिकेंतल्या प्रमुख वृत्तपत्रांनीं मदनलाल यांचें "आव्हान" प्रसिद्ध केलें. बड्या बड्या शब्दांची धूळफेक करून जगाची फसवणूक करणाऱ्या इंग्लंडची अमेरिकन पत्रांनीं आपल्या लिखाणांतून खूप फजिती केली. त्याचाच धडा आयरिश वृत्तपत्रांनीं गिरविला. जर्मनी, फ्रान्स आदि देशांनींहि हिंदुस्थानांतल्या क्रांतिकारी चळवळीचा पाठपुरावा करून इंग्लंडची निर्भर्त्सना केली.

ज्या दिवशीं धिंग्रांना फांशीं देण्यांत आलें त्या दिवशीं सकाळीं लंडनमधील हिंदी क्रांतिकारकांनीं धिंग्रा यांच्याविषयीं पुढील पत्रक काढून प्रसृत केलें :

"दि. १७ ऑगस्ट १९०९ चा हा दिवस, या दिवसाचा हा प्रात:काळ मातृभूमीवर प्रेम करणाऱ्या प्रत्येक भारतीयाच्या हृदयावर रक्ताक्षरांनीं कोरलेला राहील. या प्रात:काळीं आमचा थोर देशभक्त, आमचा प्रिय धिंग्रा पेंटनव्हिली कारागारांत फांसावर चढत आहे—त्याची पवित्र मान फांसांत अडकली आहे ! त्याचा उदात्त आत्मा त्याच्या पार्थिव शरीरांतून निघून वर स्वर्गांत जात आहे व या उत्क्रमणामुळें ज्या पक्षाच्या वेदीवर त्यानें आपलें बलिदान केलें, त्या पक्षाच्या आध्यात्मिकतेंत भर पडत आहे. धिंग्रांचें पार्थिव शरीर आतां आमच्या संनिध नाहीं पण त्यांचा आत्मा आमच्याभोंवतीं आहे, तो आमच्याभोंवतींच राहील. आणि मातृभूमीच्या विमोचनाच्या संग्रामांत तो आमचें मार्गदर्शन करील. भारताच्या इतिहासांत लिहिलेलें त्यांचें नांव उद्यांच्या भारतीय पिढीपर्यंत जाऊन पोहोंचेल. परक्यांनीं चालविलेला मातृभूचा छळ धिंग्रांना असह्य वाटला आणि मातृभूमीच्या विमोचनासाठीं चालू झालेल्या चळवळीला साहाय्य म्हणून त्यांनीं प्राणार्पण करावयाचें ठरविलें.

"इंग्लिश न्यायालयाचा माझ्यावर कसलाहि अधिकार नाहीं हें मीं आपल्याला सांगितलेंच आहे. मला माझ्या प्राणांची पर्वा नाहीं. तुम्ही सर्वशक्तिमान् आहां. मनांत येईल तें तुम्ही करूं शकतां. पण जेव्हां आम्ही शक्तिमान होऊं असाहि एक काळ येईल हें विसरूं नका. त्यावेळीं आम्हीहि हवें तें करूं." मनांत वरमून गेलेल्या न्यायाधीशानें देहान्ताची शिक्षा सांगितली तेव्हां धिंग्रांनीं हे शब्द

उच्चारले. आमच्या शत्रूंनीं आतां धिंग्रांचे प्राण हिरावून घेतले आहेत; पण हें केल्यानें त्यांना आमची चळवळ दाबून टाकतां येणार नाहीं अगर मारून टाकतां येणार नाहीं, हें त्यांनीं नीट ध्यानांत धरावें. सागरावरील भरतीच्या लाटा सामान्यत: सौम्य दिसतात पण तुफानी वाऱ्याच्या तांडवाचा स्पर्श होतांच त्यांना असें सामर्थ्य येतें कीं त्यापुढें टेकडचा व भूभागहि धुऊन जातात. मानवी समाजांत खेळणारें नैतिक बळ हें या लाटांसारखेंच असतें. देशभक्ताच्या कृतीचा स्पर्श लाभतांच या सौम्य नैतिक बळांत एका नव्या शक्तीचा संचार होतो. या नव्या शक्तीमुळें साऱ्या अडथळयांचाच चक्काचूर होतो आणि मग त्या देशभक्ताचा पक्ष यशलाभाप्रत पोहोंचतो."

दि. १०-९-१९०९ या दिवशीं प्रसिद्ध झालेल्या "वंदेमातरम्" पत्राच्या पहिल्याच अंकांत दे. भ. लाला हरदयाळ यांनीं मदनलाल धिंग्रा यांना पुढील शब्दांत सुमनांजलि अर्पिली आहे :

"इंग्लंडला वाटत आहे कीं, आपण धिंग्रांना मारून टाकलें आहे ! वस्तुस्थिति याच्या उलट आहे. धिंग्रा चिरंजीव झाले आहेत व त्यांनीं इंग्रजांच्या भारतांतील सत्तेला प्राणघातक तडाखा दिला आहे."

BVBK-0401243

# कांहीं तरी नवेंच करा

जीवनाची ठराविक चाकोरी सोडून--'कांहीं तरी नवेंच' करण्याची ईर्षा बाळगली आणि तत्सिद्ध्यर्थ विशिष्ट जीवनक्षेत्रांत अलौकिक कर्तृत्व केलें अशांची चरित्रें.

तीस मिनिटांत वाचून होणारीं पुस्तकें : शालेय-वर्गग्रंथालयासाठीं योजना

१. असा असतो देशभक्त : कोतवाल
२. गुलाम बंड करतो : स्पार्टकस
३. रा. शिक्षणाचा ध्यास : विजापूरकर
४. कादंबरीकार हरीभाऊ : आपटे
५. मराठी नटसम्राट : गण. जोशी
६. व्यायाम भीष्माचार्य : माणिकराव
७. लष्करी संघटक : क. लॅरिन्स
८. अलौकिक शिल्पकार : एंजलो
९. चित्रपट महर्षि : दादासाहेब फाळके
१०. इतिहासाचार्य राजवाडे : राजवाडे
११. बंदीजनांची माउली : फ्राय
१२. देशासाठीं दर्यापार : जेम्स कुक
१३. वीरबाला झोया : ( रशिया )
१४. बहादूर शिकारी : जिम कॉर्बेट
१५. कोई बी चीज उठाव : वुलवर्थ
१६. वीरपत्नी राणी दुर्गावती :
१७. विख्यात वकील : बॅ. जयकर
१८. विलक्षण वार्ताहर : अर्नेस्ट पाइल
१९. भारतीय चित्रकार : रविवर्मा
२०. मराठी मुद्रण-प्राणदाता : जावजी
२१. राजमाता जीजाबाई
२२. स्वदेशी कारखानदार : अंताजी काळे
२३. भव्य स्थापत्य : फर्डिनांड द लेसेप्स
२४. सर्कसबहाद्दर : विष्णुपंत छत्रे
२५. भक्तिवेडी बहिणा : बहिणाबाई
२६. सद्‌गुणी बनण्याची कला : फ्रॅंकलिन
२७. भारत-कवि टागोर : रवींद्रनाथ
२८. कोशकार केतकर : डॉ. केतकर
२९. कृषिपंडित : दादासाहेब शेंबेकर
३०. खरा खेळाडू : पी. बाळू
३१. चिरंजीव मरण : मदनलाल धिंग्रा
३२. विमामहर्षि : अण्णासाहेब चिरमुले
३३. तेजस्वी धर्मोद्धारक : शंकराचार्य
३४. बंडखोर लोककवि : अनंत फंदी
३५. साकार संगीत : पं. पलुस्करबुवा
३६. साहसी वैमानिक : सँटा ड्युमाँ
३७. दरियाचा राजा : कान्होजी आंग्रे
३८. जमिनीचा जादूगार : डॉ. कार्व्हर
३९. लाखांचा प्राणदाता : लुई पाश्चर
४० शिक्षण-भगीरथ : भाऊराव पाटील
४१. मराठी-मुद्रक : गणपत कृष्णाजी
४२. बर्फातला माणूस : हिलरी
४३. प्राणावरचा प्रवास : शिफले
४४. दानशूर कुबेर : रॉकफेलर
४५. प्रवासी पंडित : ह्युएनत्संग
४६. नृपनिर्माता : आर्य चाणक्य
४७. असामान्य क्रिकेटपटू : ब्रॅडमन
४८. लोकहिताचा संरक्षक : वि. पटेल
४९. पहिला मिशनरी : गजाननराव वैद्य
५०. तुम्हांला कोण व्हावेंसें वाटतें ?

प्रत्येक पुस्तक पन्नास नये पैसे : संच पेटी रु. २५.

व्होरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.